महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शुल्क/२०२२-२३/2775 दिनांकः- 29 AUG 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संस्थांनी महाडिबीटी पोर्टलवरील संस्थेची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्याबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/ विकाप /२०२२-२३ / २२७/ दि. २४ /०८ /२०२२

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, **शैक्षणिक वर्ष** 2022-23 **करिता**, महाडिबीटी पोर्टलवरील नोंदणीकृत असणा-या (Registered Institute) संस्थांना , संस्थांची माहिती Institute Profile अद्ययावत करण्यासाठी डीबीटील पोर्टलवर दि. ११ ऑगस्ट २०२२ पासून सुरू करण्यात आलेले आहे.

तरी सर्व संस्थांनी, महाडिबीटी पोर्टलवरील लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून संस्था माहिती अंतर्गत ( Institute Profile) असलेली सर्व माहिती जसे-शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपाशिल इ. ( Fee Detail, Course Details इ.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. **डीबीटी पोर्टलवर संस्थेकडून भरण्यात आलेले शुल्क एकदा मंजुर झाल्यास तर ते दुरूस्त करता येणार नाही. याची सर्व संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी. तसेच संस्थांनी अचुक असलेली Fee Details, Course Details सक्षम प्राधिका-याकडून मंजूर करून घ्यावी**. जेणे करून Fees Not Approved या कारणास्तव विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही, तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रतः- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता सविनय सादर.